1 8 FEB 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणपूरक बांधकाम करणे अत्यावश्यक : जैन

## विद्यापीठात काँक्रीटचे प्रकटीकरण विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वाढत्या लोकसंख्येचा आवाका लक्षात घेता बहुमजली इमारतींची उभारणी अपरिहार्य आहे. त्याचबरोबर वाढते प्रदूषण, नैसर्गिक वाळूची कमतरता या सामाजिक जाणिवांचे भान ठेवून पर्यावरणपूरक बांधकाम करणे अत्यावश्यक असल्याचे मत हेमंत जैन यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आयोजित 'काँक्रीटचे प्रकटीकरण' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

जैन म्हणाले, विद्यार्थ्यांनी फक्त परीक्षार्थी न होता ज्ञानार्थी झाले पाहिजे.तरच रोजगाराभिमुख अभियंते निर्माण होतील. यामध्ये प्रामुख्याने पायाभूत सुविधांचा विकास अपेक्षित आहे. यामुळे सध्या महामार्ग, उड्डाणपूल यांचे बांधकाम वेग घेईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यादृष्टीने सध्या वापरात असलेले सिमेंटचे प्रकार व काँक्रीटचे प्रकार अपुरे आहेत. त्यासाठी मजबूत काँक्रीट पर्यावरणपूरक आदिसारख्या विविध पर्यायांचा विचार, संशोधन व प्रत्यक्ष वापर गरजेचा आहे. कार्यक्रमास तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी अधिविभागातील सुरू असलेल्या विविध प्रकल्पांबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास महेश शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागातील स्थापत्य अभियांत्रिकीचे समन्वयक प्रा. महेश साळुंखे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2018
तरुण भारत

# व्यवस्थापन परिषदेसह स्टुडंट कौन्सिलवर आघाडीचीच बाजी



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ पातळीवरील स्टुडंट कौन्सिलची निवडणुक २७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. तर व्यवस्थापन परीषदेच्या सदस्य निवडीबाबत २६ रोजी सिनेटची बैठक होणार आहे. शनिवारी स्टुडंट कौन्सिल व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची अंतिम यादी जाहीर झाली. सर्व पात्र सदस्य विद्यापीठ विकास आघाडीचे असल्याने बिनविरोध निवडणुक होऊन व्यवस्थापन परिषद व स्टुडंट कौन्सिलवर आघाडीच बाजी मारणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलचे अध्यक्षपद कोल्हापुरला व सचिवपद साताऱ्याला देण्याचा निर्णय आघाडीच्या नेत्यांनी घेतला आहे.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेसाठी भरलेले सर्व अर्ज पात्र ठरले. तर विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलसाठी ७ पैकी २ पात्र तर सचिवपदासाठी ५ पैकी ५ अर्ज पात्र ठरले. अध्यक्षपदासाठी कमला कॉलेजमधील किशोरी पसारे तर न्यू कॉलेजमधील अभिषेक श्रीराम यांचे अर्ज पात्र ठरले आहेत. दोघेही विकास आघाडीचे कार्यकर्ते असल्याने दोघापैकी एकाची अध्यक्षपदी निवड केली जाईल. तर सचिवपदासाठी कराड तालुक्यातील उम्रज येथील मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालयातील नम्रता काटवटे, सातारा येथील अझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील अमित भिसे व इस्मालसाहेब मुल्ला लॉ कॉलेजमधील विशाल मंद्रे, सांगलीचा तालुका पलूस किर्लोसकरवाडी येथील आर्ट, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेजमधील शुभांगी नलवडे, सर्व सदस्य आघाडीचे असल्याने यापैकी एकाची सचिवपदी निवड करण्यात येईल.

**व्यवस्थापन परिषदेतील आलेले अर्ज**

प्राचार्य– खुल्या प्रवर्गासाठी चार अर्ज, व्हीजेएनटी प्रवर्गातून १, प्राध्यापक– ओबीसीमधून दोन, खुल्या प्रवर्गातून ३, संस्था प्रतिनिधी– खुल्या प्रवर्गातून १, मागसवर्गीय प्रवर्गातून १, पदवीधर– खुल्या प्रवर्गातून १, मागासवर्गीय प्रवर्गातून १, अर्ज पात्र ठरले. इतर अभ्यासमंडळे दोन, मागासवर्गीयांसाठी दोन, खुल्या प्रवर्गासाठी दोन, आदी गटांसाठी प्रत्येकी दोन प्रतिनिधींची निवड केली जाईल.

**प्राध्यापक गटातील निवडीसाठी डॉ. वसंत पाटील यांची हरकत**

व्यवस्थापन परिषदेसाठी प्राध्यापक मतदार संघासाठी खुल्या प्रवर्गातून ३ अर्ज तर ओबीसीमधून हुपरी येथील चंद्राबाई शांताप्पा शिंडोरे महाविद्यालयातील डॉ. वसंत पाटील व तिसंगी येथील शिंदे महाविद्यालयामधील डॉ. प्रकाश कुंभार या दोन सदस्यांनी अर्ज भरले होते. अर्जांच्या छाननीमध्ये सुरूवातीला डॉ. वसंत पाटील यांचा अर्ज पात्र ठरवल्याचे जाहीर करण्यात आले. सुटाच्या सदस्यांनी हरकत नोदवल्यानंतर डॉ. पाटील यांचे म्हणने न घेताच विद्यापीठ प्रशासनाने संकेतस्थळावर सुटाच्या डॉ. प्रकाश कुंभार यांचे नाव जाहीर केले आहे. त्यामुळे छाननी प्रक्रियेवर डॉ. कुंभार यांनी हरकत नोंदवणार असल्याचे सांगितले.

- कोल्हापूरला विद्यापीठ अध्यक्षपद तर साताऱ्याला सचिवपद
- स्टुडंट कौन्सिल व व्यवस्थापन परिषदेच्या उमेदवारांची अंतिम यादी जाहीर
- २६ रोजी सिनेटची बैठक तर २७ रोजी विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलचे मतदान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 FEB 2018
पुढारी

# विद्यार्थी मंडळाच्या अध्यक्षपदासाठी दोन, तर सचिवपदासाठी पाच उमेदवार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकीची छाननी प्रक्रिया शनिवारी झाली. यामध्ये अध्यक्षपदासाठी दोन तर सचिवपदासाठी पाच उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले. निवडणूक २७ फेब्रुवारीला होणार आहे. परंतु, निवडणूक बिनविरोध होण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहे. अध्यक्षपद कोल्हापूरला तर सचिवपद सातारा जिल्ह्याला असं बिनविरोधासाठी सूत्र निश्चित झालं असल्याचे समजते. व्यवस्थापन परिषदेसाठीच्या आठ जागांसाठीचीसुद्धा छाननी प्रक्रिया आज झाली.

अध्यक्षपदासाठी कमला कॉलेजमधील किशोरी पसारे तर न्यू कॉलेजमधील अभिषेक श्रीराम यांचे अर्ज पात्र ठरले आहेत. तर सचिवपदासाठी कराड तालुक्यातील



उंब्रज येथील मंगलाताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालयातील नम्रता काटवटे, साताऱ्यातील अझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील अमिता भिसे, सांगलीतील पलूस येथील आर्टस्, सायन्स, कॉमर्स कॉलेजमधील शुभांगी नलवडे, सातारा येथील लॉ कॉलेजमधील विशाल मंद्रे यांचे अर्ज पात्र ठरले आहेत. व्यवस्थापन परिषदेच्या (मॅनेजमेंट कौन्सिल) सदस्य निवडीबाबत दि. २६ रोजी सिनेटची बैठक होणार आहे.

जनसपर्क कक्ष
1 8 FEB 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील 'एनएसएस'च्या विद्यार्थ्यांचा अवयवदान संकल्प

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या २२ विद्यार्थिनी आणि ७० विद्यार्थी यांनी अवयवदानाचा संकल्प केला. यावेळी औरंगाबाद येथील राजेशसिंह सूर्यवंशी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि औरंगाबाद युथ सोशल वेल्फेअर फौंडेशन यांच्या वतीने अवयवदान जागृती कार्यक्रम झाला. सूर्यवंशी म्हणाले, सर्वसाधारणपणे एक मृतदेह सातजणांना जीवनदान देतो. तर ३५ लोकांच्या आयुष्याचा दर्जा सुधारण्यास मदत करतो. याचा अर्थ एका मृतदेहामुळे ४२ लोकांना आपले आयुष्य पूर्ववत जगता येते. यासाठी मृत्यू पश्चात अवयवदान करणे गरजेचे आहे. अवयवदानाबाबतचे गैरसमज दूर करणे गरजेचे आहेत. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

18 FEB 2018
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेब पत्रकारितेवर २० पासून कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व मास कम्युनिकेशन विभागातर्फे २० ते २३ फेब्रुवारीदरम्यान वेब पत्रकारिता आणि रेडिओ व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. वृत्तपत्र विद्या विभागात ही कार्यशाळा होणार आहे.

कार्यशाळेत २० फेब्रुवारीला सकाळच्या सत्रात रविराज गायकवाड 'डिजिटल मीडियासाठी लिखाण' या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात बी. डी. चेचर 'डिजिटल मीडियासाठी व्हिडियो आणि फोटोग्राफी' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. २१ फेब्रुवारीला



पहिल्या सत्रात विनायक पाचलग हे 'माध्यमातील बदलते तंत्रज्ञान' या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात जयकृष्ण नायर 'वेब पत्रकारितेचे भवितव्य' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

२२ फेब्रुवारीला सकाळच्या सत्रात कोल्हापूर आकाशवाणी केंद्राच्या केंद्र संचालक तनुजा कानडे या 'आकाशवाणीचे व्यवस्थापन' या विषयावर तर दुपारच्या सत्रात श्रीपाद कहाळेकर 'आकाशवाणीचे कार्यक्रम व्यवस्थापन' यावर मार्गदर्शन करणार आहेत. २३ फेब्रुवारी मनीष आपटे 'एफएमचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात शीतल माने या 'खासगी रेडिओचे व्यवस्थापन' यावर मार्गदर्शन करतील. डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. शिवाजी जाधव आणि डॉ. सुमेधा साळुंखे यांची या वेळी उपस्थिती राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2018
तरुण भारत

# विद्यापीठात 'वेब पत्रकारिता' विषयावर उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व मास कम्युनिकेशन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सोमवार २० रोजी कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. चार दिवस होणाऱ्या या कार्यशाळेत 'वेब पत्रकारिता' व 'रेडियो व्यवस्थापन' या दोन विषयावर मार्गदर्शन केले जाईल. कार्यशाळेचा समारोप शुक्रवार २३ रोजी होणार आहे. तरी विद्यार्थी, प्राध्यापकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
1 8 FEB 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज इतिहास अध्ययन केंद्रातर्फे २० फेब्रुवारी ते ३ मार्च दरम्यान मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम (अॅडव्हान्स् सर्टिफिकेट, सर्टिफिकेट कोर्स इन मोडी लिपी) आयोजित केला आहे.

कोणत्याही कालखंडाचा इतिहास लेखनासाठी संदर्भ साधनांची आवश्यकता असते. त्यापैकी मोडी लिपी हे एक प्राथमिक साधन आहे. कोल्हापुरातील व इतर पुराभिलेखागारात असंख्य मोडी कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यांचा अभ्यास करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान आवश्यक आहे. इतिहासातील मूलभूत संशोधन करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान अनिवार्य आहे. काळाच्या ओघात जिथे तिथे मराठी सत्तेचा विस्तार झाला तिथे तिथे मोडी लिपीही पोचली आहे. त्यामुळे असंख्य कागदपत्रे उपलब्ध आहेत. या अनुषंगाने मोडी लिपीचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा म्हणून विद्यापीठामध्ये या अभ्यासक्रमाचे आयोजन केलेले आहे. या अभ्यासक्रमामध्ये औरंगाबाद येथील मोडी पंडित, मच्छींद्र चौधरी व केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सर्व इतिहासप्रेमी, संशोधक व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

1 8 FEB 2018

लोकमत

## मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज इतिहास अध्ययन केंद्रातर्फे दि. २० फेब्रुवारी ते ३ मार्च या कालावधीमध्ये मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम ॲडव्हान्स सर्टिफिकेट, सर्टिफिकेट कोर्स इन मोडी लिपी आयोजित केला आहे. यात औरंगाबाद येथील मोडी पंडित, मच्छिंद्र चौधरी व केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

जनसंपर्क कक्ष
8 FEB 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात पालक मेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण प्रक्रियेत आमूलाग्र बदल होऊ लागला आहे, याची पालकांना माहिती असावी. पालकांचा मुलांच्या जीवनावर प्रभाव असतो म्हणूनच आजच्या तरुण पिढीला घडविण्यासाठी महाविद्यालयात पालक मेळावा घेण्याची गरज असल्याचे विविध मान्यवरांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात पालक मेळावा झाला. यावेळी डॉ. जयदीप बागी, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. एस. बी. सादळे, एस. बी. काळे, डॉ. ए. के. साहू आदी उपस्थित होते.